**आरती साईनाथांची**

जय देव जय देव जय साईनाथा ।। श्री सद्गुरुनाथा ।।
विश्वंभरा विश्वेशा । तारक तू जगता ।। धृ।।
ब्रह्माण्डाचा नायक देवा तू कळले ।
प्रत्यय निजभक्तांचे अद्भुत दावियेले ।।
ब्रह्मा विष्णु शङ्कर गणपती तू त्राता ।
भजतां तव पदकमला हरिसी भवचिंता ।। १।।
हरूनि दारिद्र्याते रंका रक्षियले ।
रोगग्रस्तां तुझिया उदिनें तारियले ।।
वांझेसी तोषविलें देऊनिया पुत्रा ।
जो जो वांछिल त्यांचा तू अससी दाता।। २।।
ज्ञानरवी तू दिधले ज्ञान अज्ञाना ।
सन्मार्गा लावुनिया उद्धरिले त्यांना ।।
ऐशी तू सकलांची ममताळू माता ।
रोमांचित तनु होई गुण महिमा गातां ।। ३।।
यमपाशा तोडुनी तू भक्त सोडविले ।
आयुर्बल देऊनि त्या सकला तोषविले ।।
ऐसे सामर्थ्याचे प्रताप तव गातां ।
शिणली मति मग आलों शरण तुला नाथा ।। ४।।
मद्वचनी विश्वासुनि जे सेवा करिती ।
त्यांची चिंता लागे रात्रंदिन मजसी ।।
ऐसे दृढ आश्वासन दिधलेसी जगता ।
करुणेचा सागर तू अससी गुरुनाथा ।। ५।।

समतेची योगाची मूर्ती श्री साई ।
ऋद्धिसिद्धी घेती लोळण तव पायीं ।।
अंतर साक्षी तुजला सर्वांची वार्ता ।
अगम्य तुजला कांहीं ऐसा तू ज्ञाता ।। ६ ।।
लाभे फळ करितां तव नवस समाधीला ।
दाखविसी अद्यापी निज साद लीला ।।

चुकतां पथ दर्शविसी देउनि दृष्टांता ।
हीना दीनांचा तू स्वामी हितकर्ता ।। ७ ।।
जन्मोजन्मी मजला घडुं दे श्रीदेवा ।
आशीर्वचनाची तव लाभो मज सेवा ।।
घालुनिया लोटांगण याचितसे नाथा ।
पापात्मा मी यास्तव लोटुं नका परता ।। ८ ।।